# सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर यांचे कार्यालय

**प्रशासकिय इमारत, भाग-१, चौथा मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई ४०००७१.**

Email ID : mumbaicityspldswo@yahoo.com Ph.No.२५२७५०७३


---

जा. क्र. सआसक/मुं.श./शिष्य /२०२१-२२/ ३७५० दिनांक२७/१२/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य,

सर्व महाविद्यालय, मुंबई शहर.

विषय :- सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी पोर्टलवरील योजनांचे अर्ज भरणेबाबत

संदर्भ :- १. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र ३६३२, दि १६.१२.२१

२. या कार्यालयाचे पत्र क्र ३८३६, दि १७.१२.२०२१

३. दि २२ व दि २३.१२.२०२१ रोजी आयोजित कॅम्प मध्ये दिलेल्या सूचना

४. मा. सह आयुक्त, (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, पुणे कार्यालयाकडील दि २९. १२.२०२१ रोजीच्या व्हॅटस अप् वरिल सूचना

उपरोक्त संदर्भ क्र १ ते ३ अन्वये सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील महाडीबीटी पोर्टलवरील योजनांचे अर्ज भरणेकरीता विद्यार्थी लॉगिन दि १६.१२.२०२१ पासून कार्यन्वित झालेले असून विद्यार्थ्यांना अर्ज भरणेबाबत कळविण्याच्या सूचना आपणांस दिलेल्या आहेत. संदर्भ क्र ४ अन्वये सन २०२१-२२ मधील नुतनिकरणाचे अर्ज भरण्याकरीता दि ४ जानेवारी २०२२ व नविन अर्ज भरण्याकरीता दि ९ जानेवारी २०२२ मुदत असल्याबाबतच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

सदर सूचनांचे अनुषंगाने आपणांस कळविणेत येते की आपण आपले महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांचे अर्ज विहित वेळेत भरून घ्यावेत. त्याकरीता आपले महाविद्यालयाचे व्हॅट्स अॅप ग्रुप वर, ऑनलाईन मिटींग घेवून, नोटीस बोर्डवर, महाविद्यालयाचे फेसबुक खातेवर याबाबतच्या सूचना / नोटीस पाठवून विद्यार्थ्यांना अर्ज भरणेकरीता कळवावे.

अर्ज दिलेल्या मुदतीमध्ये भरले नसल्यास व विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची नोंद घ्यावी.

कार्यालय अधिक्षक

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर

सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,

मुंबई शहर

प्रत- मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई विभाग मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर



Scanned with CamScanner